# म्यानमार, रशिया

## पुरन्दरे चन्द्रशेखर

### म्यानमार

म्यानमारमध्ये एक फेब्रुवारीला लष्कराने निर्वाचित लोकसभा रद्द करून सत्ता ताब्यात घेतली. नोव्हेंबरच्या संसदीय निवडणुकीत अफरातफर झाल्याचे कारण देण्यात आले. या निवडणुकीत लष्कराच्या पक्षाचा दारुण पराभव झाला व म्यानमारच्या सर्वोच्च नेत्या सू की यांच्या पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले. नवीन खासदार राजधानीला आले होते. कारण तेव्हाच नवनिर्वाचित लोकसभेचे पहिले अधिवेशन सुरू होणार होते. पण सू की, राष्ट्राध्यक्ष, सत्ताधारी पक्षाचे इतर वरिष्ठ नेते, राजकीय विरोधक यांना लष्कराने स्थानबद्ध केले. एक वर्षाची आणीबाणी जाहीर केली, म्यानमारमधील सर्वात मोठ्या दोन शहरात रणगाडे व ट्रक फिरवले व दहशत बसवली. तरीही लोक मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर सातत्याने निदर्शने करत आहेत व आणीबाणी उठवण्याची मागणी करत आहेत.

मध्यंतरी जरा खंडित झालेली लष्करशाहीची दुर्दैवी परंपरा परत चालू झाली. त्याचे जगभर निषेध झाले. पण हे निषेध जे चित्र उभे करतात, तसे ते लोकशाही विरुद्ध लष्करशाही, सुष्ट विरुद्ध दुष्ट असे काळे-पांढरे नाही.

### पार्श्वभूमी

१९४८ला ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य, १९६२ पर्यंत लोकशाही, नंतर लष्करशाही [२०११ ला जरा त्यात ढिलाई] २०१५ ला खरी निर्वाचित लोकशाही हा म्यानमारचा संक्षिप्त अर्वाचीन इतिहास. या दरम्यान देश जागतिक मुख्य प्रवाहातून बाहेर गेला, कंगाल झाला, वांशिक वैरे वाढली, अमली पदार्थांचे व्यसन वाढले. पैसे असणारे सगळे व्यवसाय लष्करी अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले. [पाकिस्तानप्रमाणेच.] या परिस्थितीविरुद्ध अनेक निषेध वारंवार होत गेले. ते दडपण्यात आले. त्यात म्यानमारपासून विभक्त होऊन आपला स्वतंत्र देश स्थापण्याचे विविध जनजातींचे प्रयत्न व त्यातून केंद्रीय लष्कराशी संघर्षही होते. १९८८ला मोठा उद्रेक झाला. तो दडपताना काही हजारात निषेधकांची हत्या करण्यात आली. त्या दरम्यान सू की यांचे नेतृत्व उदयाला आले नंतरच्या '९०च्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाचा विजय लष्कराने अमान्य केला. मग त्यांची १५ वर्षे स्थानबद्धता, नोबेल पुरस्कार यायोगे २०१५ च्या सार्वत्रिक निवडणुकात परत त्यांच्या पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले. यावेळी लष्कराने ते मान्य केले व तो पक्ष सत्तेवर आला. मात्र लष्कर ते निर्वाचित संसद या सत्तांतराच्या अटींनुसार संसदेत एक-चतुर्थांश सदस्य लष्कराने नेमणूक केलेले राहिले, महत्त्वाची खाती लष्कराकडे राहिली. म्हणजे, लष्करच निर्णायक भूमिकेत राहिले.

### सू की - लष्कर संघर्ष

या सत्तांतराची तुलना द. आफ्रिकेशी केली जाते. तेथे गोऱ्या राजवटीकडून मंडेलांच्या कृष्णवर्णीय राजवटीकडे सत्तांतर झाले. तेथे मंडेलांनी गोऱ्या वर्गाशी वैर कायम ठेवले नाही. त्यांना सामावून घेण्याचे धोरण ठेवले. सू की यांनी तसा प्रयत्न केल्याचे दिसत नाही. लष्कर तर 'बाहेरची' संस्था, पण लष्करविरोधी शक्ती एकत्र आणण्याऐवजी त्यांनी स्वत:च्या पक्षातील अनुभवी नेतृत्वाला डावलले आणि आपल्या भाटांना पुढे आणले, आपल्या स्थानाला संभाव्य धोका वाटणारे नेतृत्व दूर केले [इंदिरा गांधी] देशाच्या दृष्टीने अधिक घातक म्हणजे म्यानमारमधील अल्पसंख्यांक जनजातींना आणखीच परिघावर ढकलले. त्यांच्या टीकाकारांच्या मते ही एकाधिकार-शाहीची सुरुवात होती आणि सू की लोकशाहीला लष्कराइतकाच धोका होत्या.

त्यांच्या लोकशाहीविरोधी शैलीची काही उदाहरणे पाहू. रोहिंग्या या मुस्लिम अल्पसंख्यांकांचा पद्धतशीर वंशच्छेद लष्कराने चालू केला. त्या हिंसाचाराविरुद्ध सू की जाहीर भूमिका घेतील अशी जगाची अपेक्षा होती [*आंदोलन*, ऑक्टोबर २०१७]. उलट, सू की यांनी हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात या खटल्यात

लष्कराचे समर्थनच केले. याचा परिणाम विचित्र झाला. आंतरराष्ट्रीय मत सू की यांच्या विरुद्ध गेलेच [त्यांचे नोबेल पारितोषिक रद्द करावे अशीही मागणी झाली]. दुसऱ्या बाजूला लष्करालाही आपले धोरण [व त्याचे श्रेय] सू की घेत आहेत अशी खात्री झाली.

म्यानमारमध्ये अनेक जनजाती आहेत. त्यातील बमार ही एक. सू की या जमातीच्या. इतर जमाती म्हणजे - काचीन, कारेन, चिन, रोहिंग्या वगैरे. त्यांना केंद्रसत्ता मान्य नाही व म्यानमारच्या स्थापनेपासून त्यांचे केंद्राविरुद्ध उठाव चालू आहेत. ते लष्करी बळावर दाबून टाकण्यात आले आहेत. अपेक्षा अशी होती की सू की संपूर्ण म्यानमारचे नेतृत्व करतील. तसे झाले नाही. त्यांची स्वत:ची बमार जमात सोडता, वर म्हटल्याप्रमाणे इतर जमातींबद्दल त्यांचा आकस दिसून आला.

नोव्हेंबरच्या सार्वत्रिक निवडणुकात त्यांच्या सरकाने अनेक प्रादेशिक पक्षांना निवडणुकीत भाग घ्यायला बंदी केली. हे पक्ष स्थानिक जनजातींचे प्रतिनिधित्व करतात. या बंदीमुळे सू की यांचा पक्ष प्रचंड बहुमताने निवडून आला. [याबाबत निवडणुकीतील गैरव्यवहारच्या लष्कराच्या आरोपात तथ्य वाटते.]

विशेषत: रोहिंग्या मुस्लिमांना परदेशी इस्लामी आतंकवाद्यांची फूस आहे. हा त्यांचा ग्रह पक्का असल्याचेही उत्तरोत्तर स्पष्ट होत गेले. मग त्यांच्यात आणि लष्करात फरक राहिला नाही.

मागच्या वर्षी सू की यांनी सरकारवरील लष्कराचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न केला. लष्करी खासदारांची संख्या २५ टक्केहून ५ टक्केवर आणण्याचा हा प्रयत्न होता. हा प्रस्ताव प्रथमदर्शनी लोकशाहीला अनुकूल वाटतो पण ज्या विशिष्ट परिस्थितीत लष्कर व निर्वाचित सरकार ही भागीदारी झाली [द. आफ्रिकेप्रमाणे] तिच्यानुसार सू की त्या भागीदारीच्या अटी पाळत नाहीत असे लष्कराचे मत दृढ झाले.

महत्त्वाचा एक धोरणात्मक मतभेदाचा मुद्दा म्हणजे, चीन. लष्कराच्या मते चीन आपले प्रभावक्षेत्र वाढवण्यासाठी म्यानमारच्या आर्थिक दुबळेपणाचा फायदा घेत आहे; अंतर्गत फुटीर घटकांना चिथावणी देत आहे. चीनला चार हात दूर ठेवले पाहिजे. पण चिनी भांडवलप्रवेशासाठी सू की उत्सुक होत्या. त्यांनी चीनच्या अध्यक्षांना बोलावून या विषयी चर्चाही केली. ते लष्कराला पसंत पडले नाही.

**लष्कराचे हितसंबंध**

तसेच संसदीय व्यवस्था उलथून सत्ता हातात घेणाऱ्या लष्करप्रमुखाचा [Hlaingचा] कार्यकाळ या वर्षी संपतो. त्यानंतर त्याला आताची सुरक्षा, सत्ता तर मिळणार नाहीतच पण कारकीर्दीदरम्यान त्याने व त्याच्या सहकाऱ्यांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहारांची चौकशी झाल्यास ते धोक्यात येतील. आताही अमेरिकेने त्याच्यावर व काही अधिकाऱ्यांवर काही बंदी घातल्या आहेत. उदा म्यानमारमधील jade या मूल्यवान रत्नाचा व्यापार. तो लष्करी अधिकाऱ्यांच्या ताब्यात आहे. यातील काहींवर ही बंदी आहे. या खाणी ज्या प्रदेशात आहेत तेथील जमातींशी खाणींच्या मालकीवरून लष्कराचा सशस्त्र संघर्ष अनेक वर्षे चालू आहेत. Jade ला चीनमध्ये प्रचंड मागणी आहे. जीव धोक्यात घालून त्याचे उत्पादन करणारे शोषित अतिगरीब मजूर, चीनबरोबरचे स्मगलिंग, अमली पदार्थांचा वापर, त्यात गुंतलेले माफिया आणि लष्कर हा निराळ्या लेखाचा विषय होईल. यावर सू की नियंत्रण आणतील या अपेक्षेने ओबामा राजवटीने अमेरिकेची jade च्या आयातीवरील बंदी उठवली. अशा धोरणांवर आता परिणाम होईल.

**मर्यादित जागतिक दबाव**

राजकीय मुत्सद्देगिरीला आर्थिक मर्यादा असतात. आजवरचे निषेध त्या कसोटीवर पहाता अमेरिका, युरोप म्यानमारला परत लोकशाहीकडे वळवायला भाग पडू शकत नाहीत. म्यानमारमध्ये परदेशी गुंतवणुकीत सिंगापूर खूपच आघाडीवर आहे. मग चीन, हाँगकाँग, वगैरे. त्यामुळे या सत्तांतरावर त्यांच्या प्रतिक्रिया अमेरिका व युरोप यांच्याइतक्या तीव्र आल्या नाहीत. फार तर आपल्या नावाच्या प्रतिष्ठेसाठी त्या देशाशी व्यापार जागतिक कंपन्या जरा कमी करण्याची शक्यता आहे. उदा. किरीन नावाच्या जपानी बियर कंपनीने म्यानमारमधून पाय काढून घेतला आहे. पण बऱ्याच कंपन्या आम्ही लष्कराशी संबंधित नव्हतोच असा पवित्राही घेत आहेत.

**निष्कर्ष**

म्यानमारचे एकूण चित्र पहाता लष्करशाहीला पर्याय म्हणून हवी असणारी लोकशाही जर एका व्यक्तीवर केंद्रित रहाणार असेल, तर ती दगडापेक्षा वीट मऊ इतपतच श्रेयस्कर दिसते.

**रशिया**

सांगायला लोकशाही असली तरी रशियात व्लादिमिर पुतीनची एकाधिकारशाही आहे. विरोधकांना खोट्या आरोपांवरून दीर्घकाळ तुरुंगात टाकणे, प्रसंगी रशियात किंवा बाहेर ठार मारणे हा पायंडा आहे. विरोधकांच्या मालिकेतील अलीकडील प्रमुख विरोधक-अलेक्सय नवलनी. त्याच्या मते पुतीन व त्याचे निकटवर्तीय अतोनात भ्रष्टाचारी आहेत. हे जाहीर बोलणे मोठे धाडसाचे काम आहे. कारण राजवट विरोध सहन न करणारी आहे. [दिशा रवी] पुतीनच्या काळातील आधीचा एक पंतप्रधान मेदवेदेव याने पदाचा दुरुपयोग करून मिळवलेल्या अमाप संपत्तीचा तपशील नवलनीने You Tube वर प्रसृत केला. तो १० कोटी लोकांनी पाहिला. रशियनांनी अनेक शहरांत याविरुद्ध निदर्शनेही केली. आता काळ्या समुद्रावरील पुतीनच्या विलासी राजवाड्याची नवलनीकडून वार्ता आहे.

या भूमिकेमुळे आजवर त्याला अनेकदा अटक झाली आहे. पण तुरुंगवास अल्पावधीचे होते. जनक्षोभाला हा safety valve राजवटीला सोयीचा होता. मात्र अलीकडे धोरण नवलनीला अदृश्य करावे असे दिसते.

याचा पहिला प्रयोग मागच्या ऑगस्टमध्ये झाला. तेव्हा नवलनी पुतीनविरोधी प्रचार दौऱ्यावर होता. त्याच्यावर विषप्रयोग करण्यात आला. तो कोमात गेला. या घटनेचा युरोपभर तीव्र निषेध झाला. जर्मनीने खास विमानाने त्याला उपचारासाठी जर्मनीला आणले. तेथे तो बरा झाला. रशियाला परतण्याच्या जिद्दीने तो रशियात येताच विमानतळावरच त्याला अटक करण्यात आली. २०१४च्या एका जुन्या प्रकरणाचा खटला चालू झाला. हे प्रकरण राजकीय सूडबूद्धीचे आहे असा निर्वाळा २०१७लाच युरोपिअन कोर्टाने दिला होता. आता या प्रकरणात त्याला अडीच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली आहे. त्यासाठी त्याला मॉस्कोबाहेरच्या कोणत्यातरी लेबर कॅम्पला हलवण्यात येईल.

नवलनीला रशियाचा अध्यक्ष होण्याची महत्त्वाकांक्षा आहे. पुतीनने आपण २०३६ पर्यंत सत्तेवर राहू अशी तजवीज केली आहे. त्यामुळे या वैराला वैयक्तिक पदरही आहे.

http://www.art-non-deco.com
purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk